गट ब (नां)

सप्रस-(तां)



## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जुलै १९९८

214

भारताचे संविधान.

क्रमांक एसटीटी. ८५८६/(८२५)/व्यशि-३.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब या पदाच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :—

१. या नियमांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार नियम, १९९८ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) "मंडळ" म्हणजे तंत्र परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

(ब) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(क) "पदवी" म्हणजे सांविधिक विद्यापीठाची पदवी,

(ड) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन,

(इ) "मान्यताप्राप्त संस्था" म्हणजे शासनाने मान्यता दिलेली संस्था.

३. सहायक प्रशिक्षण सल्लागार महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब या पदावरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील :—

(अ) संचालनालयाचे अधिपत्याखालील सहायक अभियांत्रिकी अधीक्षक/कनिष्ठ अभियांत्रिकी/पूर्णवेळ शिक्षक/कनिष्ठ सर्वेक्षक तथा कार्य. प्रशिक्षणार्थी सल्लागार/गट-निदेशक/सहायक अधीक्षक पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व अभियांत्रिकी अथवा तंत्र शास्त्रातील पदवी/पदविका धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता आधिन पात्रता या आधारावर पात्र ठरविलेल्या व्यक्तींच्या पदोन्नतीने

किंवा

(ब) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने :—

(१) आगोदरच शासन सेवेत असलेल्या उमेदवाराखेरीज ज्याचे वय [illegible] वर्षापेक्षा जास्त नाही, आणि

(२) (अ) जो यंत्र अथवा/विद्युत अभियांत्रिकीमधील किमान दुसऱ्या वर्गातील पदवी धारण करीत आहे.

(७२)



किंवा

(ब) जो मंडळाकडील यंत्र अथवा विद्युत अभियांत्रिकीमधील किमान दुसऱ्या वर्गातील पदविका अथवा शासनाने तिच्याशी समकक्ष ठरविली आहे अशी अर्हता धारण करीत आहे व ए.एम.आय.ई. (भारत) च्या सेक्शन "ए" व "बी" उत्तीर्ण आहे आणि

(३) ज्याने वरील उपखंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर जबाबदारीच्या पदावरील कार्यशाळेमधील प्रात्यक्षिक अनुभव किंवा प्रशिक्षण संस्था/केंद्र किंवा उद्योग यामधील प्रशिक्षण किंवा शिकविण्याचा खास करून शिल्प कारागीर/शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत किमान ३ वर्षांचा अनुभव मिळविलेला आहे.

किंवा

(४) जो मान्यताप्राप्त संस्था/मंडळ यांचेकडील यंत्र अथवा विद्युत अभियांत्रिकीमधील किमान दुसऱ्या वर्गातील पदविका धारण करीत आहे व ज्याने वरील उपखंड (३) मध्ये नमूद केलेला किमान ६ वर्षांचा अनुभव मिळविलेला आहे :

परंतु जो स्नातकोत्तर पदवीधारक आहे त्याचेबाबत पदवी संपादन करण्यासाठी लागलेला परंतु दोन वर्षापेक्षा अधिक नाही असा कालावधी विहित अनुभवाच्या कालावधीसाठी गणण्यात येईल.

पुढे अशी तरतूद करण्यात येते की, विहित कालावधीचा अनुभव असणारे उमेदवार पुरेशा संख्येने जर उपलब्ध नसतील तर त्यापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या उमेदवारांचा देखील विचार करता येईल:

आणखी अशी तरतूद करण्यात येते की, ज्या उमेदवारांकडे असाधारण शैक्षणिक अर्हता/किंवा अनुभव/किंवा दोन्ही असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत जर आयोगाने शिफारस केली तर शासन प्रसंगी कमाल वयोमर्यादा २ वर्षापर्यंत शिथिल करू शकेल :—

आणखी अशी तरतूद करण्यात येते की, ज्या उमेदवारांकडे शिकाऊ उमेदवारी/शिल्प कारागीर योजनेअंतर्गत पुरेसा प्रशासकीय अनुभव आहे किंवा ज्यांचेजवळ असाधारण शैक्षणिक अर्हता/अनुभव/किंवा दोन्ही आहे अशा उमेदवारांना पसंती क्रम देता येईल.

४. नियम ३ च्या खंड (ब) च्या उपखंड (२) आणि (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी निवडीच्या कोणत्याही टप्प्याला, अनुसूचित जाती, बौद्ध धर्मांतरीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त किंवा भटक्या जमातींकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्याकरिता मूलभूत उच्चस्तर शैक्षणिक अर्हता/अनुभव धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नाहीत असे जर आयोगाचे मत झाले तर आयोगाला अशा निवडींच्या बाबतीत पदवी/पदविका यामधील उच्चस्तर वर्ग किंवा अनुभव कालावधी यांबाबतची किंवा या दोन्हीमधील अट प्रसंगी शिथिल करता येईल आणि या जाती/जमातींच्या पात्र उमेदवारांची पदांकरिता निवड करता येईल.

५. पदोन्नती व नामनिर्देशन या मार्गांनी करावयाच्या नेमणुका ५० : ५० या प्रमाणात करता येतील.

६. नामनिर्देशनाने नेमणूक केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर राहील.

७. पदोन्नती किंवा नामनिर्देशन यापैकी कोणत्याही मार्गाने नेमणूक झालेल्या व्यक्तीस जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा, त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

८. उपरोक्त नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सेवेची निकड लक्षात घेऊन जेव्हा आवश्यक असेल तेंव्हा सहायक प्रशिक्षण सल्लागार पदावर नामनिर्देशनाने भरती करण्याचे जे प्रमाण, विहित केले आहे ते प्रमाण शिथिल करावे असे शासनाच्या मते आवश्यक वाटल्यास ते प्रमाण आयोगाच्या विचारविनिमयाने शिथिल करून शासनाला नेमणुका करता येतील.

९. पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. स. ऐय्यर,

शासनाचे अपर मुख्य सचिव.